स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ २०१६/उ.नि.ख/प्र.क्र.१३/संगणकीकरण
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०७/०९/२०२१

<u>संदर्भ:</u> १) निवडणूक खर्चाचा हिशोब देण्याची वेळ व पध्दत निश्चित करणारा दि. १५/१०/२०१६ चा आदेश क्र. १
२) निवडणूक खर्चाचा हिशोब देण्याकरीता निश्चित केलेला विवरणपत्र १ ते ९ दर्शवणारा दि. २५/१०/२०१६ चा आदेश क्र. २
३) निवडणूक खर्चाचा प्रकार व बँक अकाउंटचे स्वरूप याबाबतचा दि.०२/०२/२०१७ चा आदेश क्र. ३

## निवडणूक खर्चाबाबतचे आदेश क्र. ४

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची पूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर (यापुढे '**आयोग**' असे संबोधिलेल्या) सोपविण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, घटना (७३ वी) दुरुस्ती अधिनियम, १९९२ आणि घटना (७४ वी) दुरुस्ती अधिनियम, १९९२ च्या हेतूने ठरविल्यानुसार पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुका नियमित, विहित मुदतीत, मुक्त आणि स्वच्छ वातावरणात पार पाडण्याकरिता अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, 'उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये आणि आवश्यक केलेल्या रितीने सादर करण्यात कसूर करणाऱ्या उमेदवारास अनर्ह ठरविण्याबाबत' मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ (१)(इ),

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० (१) (इ), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६ (१) (ड), महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १५ (ब) (१) आणि ५८ (१) (इ) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४ (ब) (१) मध्ये तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, या सर्व पाचही अधिनियमांच्या उपकलमांमध्ये राज्य निवडणूक आयोगास अनर्हता दूर करण्याचे किंवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याचे अधिकार आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने दि. १५ ऑक्टोबर, २०१६ आणि २५ ऑक्टोबर, २०१६ च्या आदेशांन्वये निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याकरिताची कालमर्यादा आणि रित विहित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दाखल असलेल्या रिट पिटीशन क्र. ३६३९/२०२० आणि इतर संलग्न संदर्भामध्ये दि. ११ मे, २०२१ रोजी असे निरीक्षण नोंदविले की, अनर्हतेची तरतूद ही '**व्यक्ती**' करिता असून राज्य निवडणूक आयोगाने ती व्यक्ती '**निवडणूक लढविणारा उमेदवार**' असे स्पष्ट केले आहे. तसेच असेही स्पष्ट करण्यात आले आहे की, अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर, बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवाराचा देखील 'निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये' समावेश होत असल्याने त्याने नियमानुसार निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, आयोगाचे असेही निदर्शनास आले आहे की, निवडणूक खर्च सादर करण्यासंदर्भात स्पष्टता आणून संभ्रम दूर करणे आवश्यक आहे. जसे खर्चाचा हिशोब कोण सादर करेल, केव्हा सादर करेल, कोणती कागदपत्रे सादर करेल आणि कोणाला सादर करेल, तसेच त्याचबरोबर यासंदर्भात दाखल झालेल्या विविध याचिकांना अनुसरुन 'अपिलाची' तरतूद आणि अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याचे राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार यामधील फरक स्पष्ट करणे देखील आवश्यक आहे.

आणि त्याअर्थी, दि. १५/१०/२०१६, २५/१०/२०१६ आणि २/२/२०१७ च्या आदेशातील तरतुदीदर्भात पुढे अधिक स्पष्टता आणण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १८अ (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०अ(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

१) प्रत्येक व्यक्ती, जिचे नाव 'निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये' समाविष्ट आहे, ज्यामध्ये एखाद्या पदाकरिता वैधरित्या नामनिर्देशित एकाच उमेदवाराचा देखील समावेश होतो, त्याला राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये आणि रितीने निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक आहे. मात्र नामनिर्देशनपत्र मागे घेणाऱ्या उमेदवारांना निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

२) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावी लागतील,

**अ) नामनिर्देशनपत्र दाखल केल्यापासून निकाल राजपत्रात प्रसिध्द होईपर्यंत दैनंदिन खर्चाचा हिशोब दर दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करावा, आणि**

ब) निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत संपूर्ण निवडणूक खर्चाचा हिशोब व योग्यरित्या निवडणूक खर्च दाखल केल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या तहसिलदार / सहायक आयुक्त यांच्यापेक्षा कमी नाही अशा दर्जाचा अधिकारी यांच्याकडे सादर करावे व त्याची पोहोच घ्यावी.

३) उपरोक्त २(अ) आणि (ब) मधील कागदपत्रे राज्य निवडणूक आयोगाने दि. २५ ऑक्टोबर, २०१६ च्या आदेशानुसार किंवा राज्य निवडणूक आयोगाने संगणक प्रणालीमध्ये विहित केलेल्या नमुन्यांमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

४) दैनंदिन खर्च दोन पर्यायांद्वारे सादर केला जाऊ शकतो (i) ऑनलाईन, आयोगाने विकसित केलेल्या सॉफ्टवेअरद्वारे किंवा (ii) ऑफलाइन, संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांना हार्ड कॉपीद्वारे.

५) निवडणुकीचा एकूण खर्च आणि प्रतिज्ञापत्र आयोगाने विकसित केलेल्या सॉफ्टवेअरमधून डाउनलोड केलेल्या हार्ड कॉपीद्वारे ऑफलाइन सादर केले जाईल.

६) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची मोठी संख्या विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चाचा हिशोब विहित वेळेत अथवा विहित रितीने दाखल करण्यास कसूर करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अथवा अनर्हता दूर करणे किंवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ०५/०६/२०१०, दि. १९/११/२०१०, दि. १०/०८/२०१५ च्या आदेशान्वये प्रदान केले होते. मात्र आता यासंदर्भातील यापूर्वीचे आदेश अधिक्रमित करून सदर अधिकार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | अधिनियमांतर्गत अधिकार | प्रदान केलेला अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका | मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६(१)(इ), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० (१) (इ) | विभागीय आयुक्त |
| २ | नगरपरिषद (अ आणि ब वर्ग) | महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६ (१) (ड) | विभागीय आयुक्त |
| ३ | नगरपरिषद (क वर्ग) आणि नगरपंचायत | महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६ (१) (ड) | जिल्हाधिकारी |
| ४ | जिल्हापरिषद | महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १५ (ब) (१) | विभागीय आयुक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | पंचायत समिती | महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ५८ (१ ई) | जिल्हाधिकारी |
| ६ | ग्रामपंचायत | महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४ (ब) (१) | जिल्हाधिकारी |

(७) अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याचे अधिकार :-

i. अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १६(१)(एफ), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १० (१) (एफ), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १६ (१) (इ), महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १५ (बी) (२) व ५८ (१ ई) आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १४ (ब) (२) मध्ये तरतूद आहे.

ii. सदर अधिकार हे राज्य निवडणूक आयोगाचे विशेषाधिकार असून त्याचा वापर राज्य निवडणूक आयोगास स्वत:हून अथवा अनर्ह झालेल्या उमेदवाराच्या विनंती वरुन वापरता येतात.

iii. सदर अधिकार हे विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमांमध्ये एखाद्या उमेदवाराला अनर्ह ठरविण्याकरिता सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याने (वरील परिच्छेद ४ मध्ये अधिकार प्रदान केलेले प्राधिकारी) पारित केलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीने दाखल करावयाचे ‘अपिल’ यापेक्षा संपूर्णपणे भिन्न आहेत.

iv. अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित आहेत. राज्य निवडणूक आयोगाने सदर विशेषाधिकार वापरुन पारित केलेले आदेश अंतिम असतील.

४. राज्य निवडणूक आयोगाकडे अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबत केलेल्या विनंती अर्जास 'विशेष अर्ज' आणि त्यावर देण्यात आलेल्या आदेशास "विशेष आदेश" असे संबोधण्यात येईल.

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

प्रति,
१. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
४. सर्व विभागीय आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व महानगरपालिका आयुक्त
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
८. सर्व नगरपरिषदा / नगर पंचायतींचे संबंधित तहसिलदार तथा प्रशासक / मुख्याधिकारी
९. राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनेलचे वकील
१०.आयोगातील सर्व कक्ष